**SNDT Women's University**
**Department of Students' Development**
1st Floor, Patkar Hall Building,
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai - 400 020.

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
**विद्यार्थी विकास विभाग**
पहिला मजला, पाटकर हॉल इमारत,
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.

Telephone : 2203 1879 Ext. 1302 & 1260 • Direct : 022-2207 2209 / 2201 8893
Email id :- dsw@sndt.ac.in • Website : www.sndt.ac.in

संदर्भ क्र.वि.वि.वि./शिष्यवृत्ती/२०२५-२०२६/१४. दिनांक:२८/०५/२०२५

प्रति,
प्राचार्य/विभाग प्रमुख / संचालक,
संचलित आणि संलग्नित महाविद्यालये, विभाग व संस्था
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,
मुंबई.

विषयः उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील **"गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती"** या योजनेअंतर्गत सन २०२५-२६ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भः
१) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्रक्र.२१८/तांशि-४, दि. ०४.१०.२०१८
२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दि. ०६.०९.२०२१
३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक-२०२२/प्र.क्र.१८८/तांशि-४, दि.३१.०७.२०२३
४) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२४३/तांशि-४, दि. ०६.०८.२०२४
५) तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य क्र. परदेशी शिष्यवृ-२०२५/प्र.क्र.-२८४, दि. १९.०५.२०२५

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यांत येत असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच. डी अभ्यासक्रमासाठी QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतात त्यांना ही शिष्यवृत्ती देय ठरते, व त्याबाबतचे निकष खाली नमूद केले आहेत. दि. ३१ जुलै, २०२३ शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून दि. ४ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या सर्व शाखांमधील पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची संख्या १० वरून ३० व डॉक्टरेटकरिता १० विद्यार्थी अशा एकूण ४० विद्यार्थ्यांची शाखानिहाय विभागणी करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ४० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रीया संचालनालयाच्या **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरुन सुरु करण्यांत आलेली आहे.

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेतः**

- उमेदवार व उमेदवाराचे आई वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२५ मधील) QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गानी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२४-२५ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर खालील शासन निर्णय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, त्याप्रमाणे या शिष्यवृत्तीबाबतच्या अर्जाची छाननी होणार आहे.

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८

३. दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ ची शासन शुध्दीपत्रक

४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१

५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक-२०२२/प्र.क्र.१८८/तांशि-४, दिनांक ३१ जुलै २०२३

६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२४३/तांशि-४, दि. ०६ ऑगस्ट, २०२४

सदर शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दिनांक १८.०५.२०२५ रोजी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील "अ" दर्जाच्या वर्तमानपत्रातील सर्व आवृत्यांमध्ये जाहिरातही प्रसिध्द करण्यात आली असून इच्छुक उमेदवारांनी **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत **२५.०६.२०२५** तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे /कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात दिनांक **-२० मे २०२५ ते २७ जून २०२५ (सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत)** सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती करण्यांत येत आहे.

१) सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यांत यावी.

२) आपल्या विद्यापीठाच्या/महाविद्यालयाच्या/संस्थेच्या अधिकृत वेबसाईट, ट्विटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.

३) कॅम्पस रेडिओ, विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे/संस्थेचे न्युज लेटर या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन सदर योजनेची
माहिती व जाहिरात यास प्रसिध्दी द्यावी.

४) आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसअप ग्रुप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यांत याव्यात.

५) सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्यूब, इ. माध्यमांचा सुध्दा वापर करावा.

६) सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विद्यापीठाच्या/महाविद्यालयाच्या परिपत्रकाव्दारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आपल्याशी संलग्नित सर्व संस्थांना सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात यावे.

आपला विश्वासू

28/05/2025

डॉ. नितीन स. प्रभूतेंडोलकर
विद्यार्थी सहाय्यक अधिष्ठाता
विद्यार्थी विकास विभाग

**प्रत रवाना:**

**१) डॉ. एच. टी. जाधव, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ**

**२) कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ**

**३) सहाय्यक कुलसचिव, अकॅडमीक कक्ष, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ**